# पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातुन घातलेला भारतीय कृषी विकासाचा पाया : एक ऐतिहासिक अध्ययन (इ.स. १९५१ ते १९६६)

**भोगेकर सचिन पत्रुजी,** संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, नागपूर

**सारांश:** भारतातील प्रमुख व्यवसाय हा कृषी आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशासमोर अनेक आव्हाने होती त्यामध्ये देशातील वाढत्या लोकसंख्येला अन्नधान्याचा पुरवठा करणे व कृषी विकासासाठी नियोजन करणे. त्याकरीता नियोजन आयोगामार्फत रशियन पध्दतीवर आधारीत भारतात पंचवार्षीक योजना सुरू करण्यात आल्या. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाचा कृषी विकास करण्यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून अनेक उपाययोजना करण्यात आल्या. प्रस्तुत संशोधनामध्ये भारतीय कृषी विकासाच्या पहिल्या तिन पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातून झालेल्या कृषी विकासाचा अभ्यास व त्याचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर व शेतकरी वर्गावर पडलेला प्रभावाचा अभ्यास केल्या गेला आहे. कृषी विकासासाठी भारत सरकारने पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातून भुसुधारणा, कृषी यांत्रीकरण, किटकनाशक, रासायनिक खते, सिंचनसुविधा, फलोत्पादन कृषी उत्पादन वाढविण्यासाठी अनेक प्रयत्न केले. तसेच सहकारी समित्या, सामुदायी विकास कार्यक्रम, दुध उत्पादन, मत्सउद्योग इ. विकासाला चालना देण्यात आली. त्यातून देशातील कृषीचा विकास होवून उत्पादनात वाढ झाली व देशाचे राष्ट्रीय उत्पन्न वाढले. देशाची कृषी उत्पादनामधून होणारी निर्यात वाढली. एकूण पहिल्या तिन पंचावार्षीक योजनाच्या माध्यमातून कृषी विकासाचा पाया घातला गेला.

**शब्द — कुंजी :—**प्रथम पंचवार्षीक योजना, द्वितीय पंचवार्षीक योजना, तिसरी पंचवार्षीक योजना, कृषी व सिंचन विकास, सहकारीता सामुदायीक विकास, भु—सुधार, कृषी यांत्रीकीकरण इ.

**प्रस्तावना :—**देशाला स्वातंत्र्य मिळाल्या नंतर देशासमोर अनेक समस्या होत्या. त्या सर्व आव्हानांना समोर जावून देशाचा विकास करणे आवश्यक होते. विकासाचे नियोजन करण्यासाठी नियोजन आयोग स्थापन करण्यात येवून त्याद्वारे पंचवार्षीक योजना सुरू करण्यात आल्या. त्यामध्ये देशातील प्रमुख व्यवसाय कृषी असल्यामुळे व रोजगाराचे साधन असल्यामुळे नियोजनामध्ये कृषी विकासाला प्राधान्य देण्यात आले. देश स्वतंत्र होण्यापूर्वीच विकासाचे नियोजन सुरू करण्यात आले होते. त्यात प्रथम विश्वेश्वरय्या यांनी १९३४ मध्ये 'भारतासाठी नियोजीत अर्थव्यवस्था' (च्संददमक म्बवदवउल वित प्दकपं) हा ग्रंथ लिहून भारताच्या भावी नियोजनाची कल्पना मांडली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने १९३८ मध्ये 'राष्ट्रीय नियोजन समिती' छंजपवदंस च्संददपदह ब्वउउपजजमम तयार केली. श्री. एम. एन. रॉय यांनी रशियन पध्दतीवर आधारीत 'जनता योजना' मांडली त्यानंतर बॉम्बे योजना अशा अनेक नियोजनासाठी योजना मांडण्यात आल्या होत्या परंतु भारत स्वतंत्र नसल्यामुळे त्या पूर्णत्वास गेल्या नाही.

**पंचवार्षीक योजनेची प्रेरणा :—**स्वतंत्र भारताचा नियोजीत विकास करण्यासाठी देशात १९५० मध्ये 'नियोजन आयोग' स्थापन करण्यात येवुन १९५१ मध्ये 'पहिली पंचवार्षीक योजना' सुरू करण्यात आली. देशातील पंचवार्षीक योजना सुरू करण्याची प्रेरणा रशियाकडून मिळाली. रशियामध्ये रशियन राज्यक्रांन्ती १९१७ मध्ये झाल्यानंतर लेनिन सरकारने व स्टॅलीनने कृषी विकास करण्यासाठी एक 'नियोजन मंडळ' स्थापन करून १९२७ पासून पंचवार्षीक योजना सुरू केली. या नियोजीत विकासाच्या माध्यमातून रशियाने मोठया प्रमाणात कृषी विकास साध्य केला. तेव्हा नुकताच स्वतंत्र झालेल्या भारतालाही कृषी विकास व देशाचा विकास करण्यासाठी नियोजनाची गरज भासु लागली. रशियन नियोजन व पंचवार्षीक योजनेतून प्रेरणा घेत भारतात पंचवार्षीक योजना सुरू करण्यात आल्या.

**संशोधनाचे उद्देश :—**

१) पहिल्या तिन पंचावार्षीक योजनेच्या माध्यमातून झालेल्या कृषी विकासाचे अध्ययन करणे.
२) कृषी विकासाचा कृषकवर्गावर पडलेला परिणामाचा अभ्यास करणे.
३) कृषी विकासातून देशातील राष्ट्रीय उत्पादनावर पडलेला परिणामाचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दत:—**हे संशोधन 'ऐतिहासिक पध्दतीवर' आधारीत असून त्यासाठी 'पंचवार्षीक योजनेसंदर्भातील भारत सरकारचे अहवाल', सांख्याकीय विश्लेषण, कृषी आयोगाचे अहवाल वार्षीक भारत सरकारचे अहवाल, कार्यालयीन माहिती, मासिके तसेच पंचवार्षीक योजनांवर लिहिल्या गेलेली पुस्तके यांना संशोधनासाठी उपयोग केलेला आहे.

**१) इ.स १९५१ ते १९६६ या दरम्यान योजनांवरील खर्च व लक्ष्य—**देशातील कृषीचा नियोजीत विकास करण्यासाठी कृषी व संबंधीत क्षेत्रात मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला. पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये एकूण १,९६० करोड रू. खर्च करण्यात आले. त्यातील कृषी व सम्बंधीत क्षेत्रावर ६०० करोड रू. खर्च करण्यात आला. हा खर्च एकुण पंचवार्षीक योजनेतील खर्चाच्या ३१ टक्के होता. दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये एकूण योजना खर्च ४,६७० करोड रू. होता. त्यातील कृषी व सम्बधीत क्षेत्रासाठी ९५० करोड रू. खर्च करण्यात आले व ते एकुण खर्चातील २० टक्के रक्कम होती. तिसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये एकूण ८,५८० करोड रू. खर्च करण्यात आले. त्यातील १,७५० करोड रू. कृषी व संबंधीत व्यवसायावर करण्यातआले, हा खर्च एकूण खर्चाच्या २१ टक्के होता.

**२) कृषी विकासासाठी राबविल्या गेलेल्या योजना.**

**भु—सुधारणा:—**स्वतंत्र भारतातील भुव्यवस्थेमध्ये अनेक दोष होते त्यात देशातील बरीचशी जमिन जमिनदारांकडे होती. महाजनांकडे मोठया प्रमाणात जमिन गाहान होती. जमिनीच्या मालकीहक्कामध्ये तफावत होती. मोठे जमिनदार लहान शेतकऱ्यांचे शोषण करीत. एका व्यक्तीकडे किती जमिन राहील याची निश्चिती नव्हती असे अनेक दोष होते ते दुर कण्यासाठी काही भु—सुधारण करणे आवश्यक होते.त्यासाठी केन्द्रसरकारद्वारा भुमीसुधार व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी 'केन्द्रीय भुमी सुधार समिती' स्थापन करण्यात आली व त्याद्वारे सरकार भुमी सुधार पध्दती, त्यावरील उपाय व नियोजनावर चर्चा करून भुमी सुधारणेचा आढावा घेण्याचे काम करत एकूणनच भुमी सुधारणेच्या माध्यमातून सामाजिक न्याय प्रस्थापीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**भुमी सुधारणेचे उद्‌देश—** देशातील प्रत्येक राज्याची भौगोलीक परिस्थिती वेगवेगळी असुन भुधारण व्यवस्थाही वेगवेगळी होती. त्यामुळे प्रत्येक राज्यानी वेगवेगळे भुमीविषयक कायदे केलेली दिसून येते तरी सुध्दा काही गोष्टी सर्व राज्यात सारख्या दिसुन येतात.

१) राज्य व शेतकरी यांच्यामधील मध्यस्ताची समाप्ती करणे.
२) दुसऱ्याच्या जमिनीवर काम करणाऱ्या शेतकऱ्यांच्या अधिकाराचे रक्षण करणे.
३) एक व्यक्ती आपल्या अधिकारामध्ये किती जमिन ठेवु शकेल यासाठी नियम तयार करणे.

**३) भु—सुधारणेसाठी राबविल्या गेलेले उपाय**

**अ) मध्यस्थांचे उच्चाटन—**देशातील स्वातंत्र्याअगोदर ४० टक्के जमिन मध्यस्ताकडे होती. स्वातंत्र्याअगोदर महसुल वसुल करण्यासाठी सरकार व कृषक यांच्यामध्ये मध्यस्त नियुक्त केल्या जात. या मध्यस्थाचे उच्चाटन करण्यासाठी १९५४ पर्यंत अनेक भुमी नियम बनविण्यात आले. त्यानुसार मालगुजारी स्वत: भु—स्वामी वसुली करीत. मध्यस्ताच्या उच्चाटनामधून जवळपास २ करोड पेक्षा जास्त कृषकांचा सरकारशी संबंध आला. ९७ लाख शेतकऱ्यांना ६८ लाख हेक्टर भु—क्षेत्रावर मालकी हक्क मिळाला. बंजर जमिन वनक्षेत्राच्या माध्यमातुन ६५ लाख हेक्टर भुमी भुमिहिनांना वाटण्यात आली. भुस्वामीना मालकी हक्क सोडण्यासाठी नुकसान भरपाई देण्यात आली. ती प्रत्येक राज्यानुसार वेगवेगळी होती. मध्यस्तांचे उच्चाटन करण्यात आले परंतु मध्यस्त स्वत: शेती करण्यासाठी पुन्हा आपल्या जमिनीवर अधिकारप्राप्त करू शकत होता त्यामुळे अनेक मध्यस्तांनी लोकांकडून जमिनी परत घेतल्या तसेच मध्यस्तांना दिल्या गेलेली नुकसान भरपाई खुप जास्त होती.

**ब) भु—सुधार व्यवस्था** (Tenancy Reform):—भुमी—सुधारव्यवस्थेमध्ये जे शेतकरी जमिन पट्ट्यावर घेवून कसतात त्यांच्या हिताचे रक्षण करण्यात आले. देशांत अंदाजाने एकूण २० टक्के कास्तकारी जमिन होती. यामध्ये यासाठी महसुलाची निश्चिती करणे, जमिनीची सुरक्षा, कास्तकारांना मालकी हक्क देणे यासाठी प्रयत्न करण्यात आले. स्वातंत्र्यांनंतर पट्टेदारांकडून जो महसुल घेतला जात होता तो २० किंवा २५ टक्क्यापेक्षा जास्त नसावा. तसेच शेतकरी तो जोपर्यंत महसुल देत आहे तोपर्यंत जमिन परत घेता येणार नाही. अपवाद एखादया शेतकऱ्याने महसुल न दिल्यास जमिनीचे नुकसान केल्यास जमिन परत घेता येईल. परंतु ती दुसऱ्या शेतकऱ्याला देणे आवश्यक होते. तसेच जमिनीचा मालक स्वत: जमिन कसण्यासाठी परत मागवू शकतो परंतु त्यासाठी निश्चित सिमा निर्धारीत करण्यात आली होती व शेतकऱ्याकडे कमीत कमी जमिन असणे आवश्यक होते. त्यानुसार प्रत्येक राज्यात वेगवेगळे नियम करण्यात आले. अशा प्रकारे संपूर्ण देशातील ९७ लाख शेतकऱ्यांना ६८ लाख हेक्टर शेतजमिनीवर मालकी हक्क मिळाला.

**क) कमाल जमीन धारण कायदा** –Ceiling on Land Holding:– कमाल जमिन धारण कायदयाअन्तर्गत जास्तीत जास्त जमिन असलेल्यांकडून काढून घेवून भुमीहिनाना वाटप करण्यात आले. या कायद्याने एका व्यक्तीकडे जास्तीत जास्त किती जमिन राहिल व भविष्यातही किती जमिन घेता येईल याची मर्यादा निश्चित करण्यात येवून जास्तीची जमिन काढुन घेवुन वाटप करण्यात आली. कमाल जमिन भुधारण कायदा प्रत्येक राज्यानुसार वेगवेगळा करण्यात आला त्यात त्यामध्ये बरेच दोष राहिले. त्यात संपूर्ण कुटूंबाला एक न मानता प्रत्येक व्यक्तीला भूमी ठेवण्याचा अधिकार देण्यात आला त्यामुळे अनेक कुटूंबाकडे मोठया प्रमाणात जमिनी राहिल्या. तसेच काही जमिनीला या कायद्या अंन्तर्गत सुट देण्यात आली असल्यामुळे संपूर्ण उद्देश पूर्ण होवू शकले नाही.कमाल जमिन धारण कायद्याअंन्तर्गत अंदाजे ७३.४८ लक्ष्य एकर अतिरिक्त जमिन म्हणून घोषीत करण्यात आली. त्यातील ४४.९२ लक्ष्य एकर जमिन सरकारने ४१.५२ लोकांमध्ये वाटप करण्यात आलीत व ही जमिन अनुसूचित जाती व जमातीमध्ये वाटप करण्यात आली.देशामध्ये सामाजीक न्याय प्रस्तापीत करण्यासाठी भुमीमध्ये असलेली असमानता दुर करणे आवश्यक होते. कमाल जमिन धारण कायद्याअंन्तर्गत बऱ्याच सुधारणा करण्यात आल्या. त्यातून समाजात समानता प्रस्तापीत होण्यास मदत झाली. या कायद्यामधील दोष म्हणजे कायदा लागू होण्याअगोदरच जमिनदारांनी जमिनी आपले कुटूंब, नातेवाईक यांच्या नावे लावून दिल्या त्यामुळे जास्तीत जास्त जमिन अतिरिक्त म्हणून ठरविल्या गेली नाहीत.

**२) कृषी यांत्रीकीकरण:**–कृषी यांत्रीकरण म्हणजे शेतीकार्य करण्यासाठी यंत्राचा वापर करणे, जर कृषीकार्य करण्यासाठी पेट्रोल, डिजल यांच्यावर चालणाऱ्या यंत्राचा वापर केला जात असेल तर त्याला यांत्रीकीकरण म्हणता येईल. विकसित देशात मोठया प्रमाणात यांत्रीकीकरण झालेले दिसून येतात. भारतामध्ये मात्र अजुनही पाहीजे त्या प्रमाणात यंत्राचावापर दिसुन येत नाही. त्यासाठी देशात अनेक समस्या दिसुन येतात. भारतीय कृषीचा लहान आकार, शेतकऱ्यांकडे आर्थिक पाठबळ कमी असणे, देशातील जास्तीत जास्त लोक कृषीकार्यावर रोजगार प्राप्त केल्यामुळे यांत्रीकरणाने रोजगाराची कमतरता जाणवणे यामुळे यांत्रीकरण होवू शकले नाही. कृषी यांत्रीकीकरणामध्ये भारत मागे असला तरी सुध्दा पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून यांत्रीकीकरण करण्यावर जोर देण्यात आला.

**पंचवार्षीक योजना काळातील कृषी वित्त पुरवठा** – भारतीय कृषी सदा निसर्गावर अवलंबुन असल्यामुळे भारतीय शेतकरी विवंचनेत असतो त्यामुळे त्याला कधी ओला दुष्काळ तर कधी सुखा दुष्काळाचा सामना करावा लागतो. अशावेळी गरज पूर्ण करण्यासाठी सावकार व महाजनांकडून कर्ज काढावे लागते त्यामुळे सावकार शेतकऱ्यांची पिळवणूक करीत शेतकऱ्यांना या परिस्थिती बाहेर काढण्यासाठी पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातून काही पावले उचलण्यात आली. शेतकऱ्यांना दोन प्रकारे कर्जपुरवठा केला जातो. त्यामध्ये संस्थात्मक कर्जपुरवठा या अंन्तर्गत सरकार, सहकारी संस्था व व्यापारी बँका यामार्फत तर खाजगी कर्जपुरवठा या अंन्तर्गत सावकार, नातेवाईक, व्यापारी दलाल, भुस्वामी यांच्याद्वारे दिला जातो.

ग्रामीण भगाात कर्जपुरवठा करणाऱ्या संस्था १९५१–५२

| | कर्ज पुरविणारी संस्था | एकूण कर्जात शेकडा वाटा १९५१–५२ |
|---|---|---|
| अ) | खाजगी कर्ज | |
| १) | सावकार | ६९.७ |
| २) | नातेवाईक | १४.२ |
| ३) | व्यापारी | ५.५ |
| ४) | भुमीपती व इतर | ३.३ |
| | एकूण १ ते ४ | ९२.७ |
| ब) | संस्थात्मक कर्ज | |
| ५) | सरकार | ३.१ |
| ६) | सहकारी संस्था | ३.३ |
| ७) | व्यापारी बँका | ०.९ |
| | एकूण (५ ते ७) | ७.३ |
| | एकूण कर्ज (अ + ब) | १००.० |

संदर्भ — भारतीय नियोजन आणि आर्थिक विकास, श्री. आ. देशपांडे, विद्या प्रकाशन, नागपूर — १९९५ पृष्ठ क्र. १५७

वरिल आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की १९५१—५२ मध्ये खाजगी कर्जाचे प्रमाण हे एकुण कर्जाच्या ९२.७ होते तर संस्थात्मक कर्जाचे प्रमाण एकुण कर्जाच्या फक्त ७.३ टक्के होते.

पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातून संस्थात्मक कर्जपुरवठा वाढविण्यावर भर देण्यात आला त्यासाठी १९५०—५१ मध्ये प्राथमिक सहकारी कृषी कर्ज समित्यांची संख्या १०५ हजार होती. त्यांच्याद्वारा अल्प व मध्यम कर्ज स्वरूपात २३ करोड रू. देण्यात आले सहकारी भुमी विकास बँकेने १९५०—५१ मध्ये बँकाची संख्या २८६ होती व कर्जपुरवठा १.४ करोड रू. केला होता. त्यानंतर रिजर्व्ह बँकेने कृषी कर्ज वाटपासाठी अनेक उपाययोजना केल्या. रिजर्व बँक अल्पकालीन, मध्यम व दिर्घकालीन कर्ज पुरवठा करते. भुमी सुधारणा, बांधकाम, सिंचन, पशुखरेदीसाठी कर्जपुरवठा करते. भारतात १९५०—५१ मध्ये भुमी विकास बँका २८६ होत्या त्या वाढून वर्ष १९६०—६१ मध्ये ४६३ झाल्या या बँका शेतकऱ्यांना दिर्घ मुदतीवर कर्ज वाटप करतात.

**सिंचन विकास** —भारतीय कृषी ही मुख्यता निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून आहे. निसर्गाने साथ दिल्यास उत्पादन चांगले होते. अन्यथा शेतकऱ्यांना दुष्काळाचा सामना करावा लागतो. संपूर्ण भारतात एकसारखा पाऊस पडत नसल्यामुळे कुठे जास्त पाऊस तर कुठे अत्यंत कमी पाऊस पडतो. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होते. तेव्हा त्यातून बाहेर पडण्यासाठी सिंचन सुविधा उपलब्ध करण्याची आवश्यकता आहे. संपूर्ण भारतात फक्त २८ टक्के भागात चांगला पाऊस पडतो बाकी ७२ टक्के भाग हा कमी पावसाचा असून दुष्काळी परिस्थिती निर्माण होताना दिसते.स्वातंत्र्यानंतर पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातुन जलसिंचन प्रकल्प बांधायला सुरूवात करण्यात आली. पंतप्रधान नेहरू यांनी नियोजनातून नविन धरणे बांधायला प्रोत्साहन दिले.

देशामध्ये पंचवार्षीक योजनेच्या माध्यमातून नियोजनबध्द सिंचन प्रकल्प तयार करण्यात आले त्यमध्ये मोठे सिंचन प्रकल्प, मध्यम सिंचन प्रकल्प, लहान सिंचन प्रकल्प तयार करण्यात आले. पंचवार्षीक योजनेदरम्यान तुंगभद्रा प्रकल्प, दामोधर प्रकल्प, कोनार, पंचेरटेकडी दुर्गापूर, टाकरापार प्रकल्प, गांधी सागर प्रकल्प, भाकरा नांगल प्रकल्प, मयुरकाशी प्रकल्प या प्रकल्पाच्या माध्यमातून सिंचनाचा विकास व विज उत्पादन वाढविण्यावर भर देण्यात आला.

**सिंचन व्यवस्था — १९६२—६३**

| | | मिलियन हेक्टर | मिलियन हेक्टर |
|---|---|---|---|
| १) | सरकारी कॅनल | ९.६९ | २३.९५ |
| २) | प्रावेट कॅनल | १.१७ | २.९० |
| ३) | तलाव | ४.७३ | ११.७० |
| ४) | विहिरी | ७.६६ | १८.९५ |
| ५) | इतर साधने | २.३९ | ५.९० |
| | एकुण | २५.६४ | ६३.४० |

स्त्रोत — A History of Agriculture in India – M.S. Randhwa Vol. No. IV – Indian Couuncil of Agricultural Research New Delhi – १९८६ पेज क्र. ७६

वरिल तक्तावरून असे म्हणता येईल की स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सिंचन विकासाचा वेग वाढलेला दिसून येतो. १९४७—४८ मध्ये १८.७ मिलियन हेक्टर (४६.७ मिलियन) एकर सिंचन व्यवस्था होती ते १९६२—६३ मध्ये २५.६४ मिलियन हेक्टर व ६३.४० मिलियन ऐकर वाढलेले दिसून येते.

**पशुपालन**—भारतीय लोकांचा कृषी हा प्रमुख व्यवसाय असल्यामुळे कृषी कार्य करण्यासाठी मोठया प्रमाणात पशुचा वापर केल्या जातो. तसेच पशुपासुन रोजच्या दैनंदीन गरजा भागविण्यासाठी दुध, दही, मास व आर्थिक उत्पादन व रोजागार प्राप्त होतो. त्यामुळे कृषीला साहाय्यक व्यवसाय म्हणून पशुपालनाकडे पाहीले जाते. कमी पावसाचा व डोंगराळ भागात महत्वाचे उत्पादन साधन म्हणून पशुपालन व्यवसायाकडे पाहिले जाते. जमिन जुंपने, नांगरणे, पेरणे इत्यादी कार्यासाठी पशुवापर तसेच लोकर, गरम कापड, चमडा, दुधापासुन बनविणाऱ्या वस्तु उद्योगात वापरल्या जातात. यासाठीही पशुपालन व्यवसाय अत्यंत महत्वाचा आहे.कुठल्याही देशाच्या अर्थव्यवस्थेमध्ये पशुउत्पादन अत्यंत महत्वाचे असते. देशामध्ये पशुपालन व्यवसायातून मिळणारा राष्ट्रीय उत्पादनाचा वाटा हा १८ ते २०

टक्के आहे. इतर युरोपीय देशामध्ये पशुसंख्या कमी असुन पशुपासुन मिळणारे उत्पादन मात्र जास्त आहे. काही देशात तर ६० ते ८० टक्के वाटा पशुपालनाचा आहे. भारतामध्ये पशुंची संख्या सर्वात जास्त आहे.

**पंचवार्षिक योजनांअन्तर्गत पशुपालन विकासासाठी ठेवलेली उद्‌दीष्टये :—**

१) पशुपालनामधुन दुध व दुधापासुन बनणाऱ्या वस्तुची वाढ करणे.
२) शेती कसण्यासाठी उपयोगी पशुमध्ये वाढ करणे.
३) लोकर व चामडयाच्या उत्पादनात वाढ करणे इ.

ग्रामीण विकासासाठी व ज्या भुमीहीन मजूर, ज्यांच्याकडे कमीजमिन आहे. महिलांना रोजगार देण्यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात आला. १९५०—५१ मध्ये दुध उत्पादन १७ मिलियन टन होते व दुधाची प्रतिव्यक्ती उपलब्धता १२४ ग्रॅम प्रतिदिन होती. त्यात १९६०—६१ मध्ये वाढुन दुध उत्पादन २० मिलियन टन होते तर प्रती व्यक्ती उपलब्धता १२४ ग्रॅम होती.देशामध्ये पशुंची संख्या मोठया प्रमाणात आहे मात्र त्यातुलनेने त्यांना चराईसाठी लागणारे कुरणे अत्यंत कमी आहे. देशतील अनेक जनावरे मातारी व काम न करणारी आहेत त्यामुळे त्यापासून उत्पादन मिळत नाही.

**दुध उत्पादन आणि प्रति व्यक्ती दुधाची उपलब्धता**

| वर्ष | दुध उत्पादन (मिलियन टन) | प्रति व्यक्ती उपलब्धता गॅम १ दिवस |
|---|---|---|
| १९५०—५१ | १७.० | १२४ |
| १९६०—६१ | २०.० | १२४ |
| १९७०—७१ | २२.० | ११२ |

स्त्रोत — Economic Survey – १९९६.९७ टेबल क्र. ८.२२

वरिल तालिकेवरून असे लक्षात येते की १९५०—५१ मध्ये दुध उत्पादन १७.० मिलियन टन होते ते १९६०—६१ मध्ये २०.० मिलियन टन झाले. १९७०—७१ मध्ये २२.० मिलियन टन प्राप्त झाले.

**मत्स्य उत्पादन—**देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर मत्स्य उत्पादन वाढीसाठी अनेक प्रयत्न करण्यात आले. मत्स्य उत्पादन वाढीसाठी अंदमान द्विप — समुह, पूर्व आणि पश्चिम तटावर अनेक केंद्र स्थापन करण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षीक योजने अन्तर्गत रेफ्रिजरेटर मध्ये मासे पोहचविण्यासाठी शित रेल्वे डब्बे उपलब्ध केल्या गेले. मासे पकडण्याच्या ठिकाणी बर्फ व कोल्ड स्टोरेजची व्यवस्था करण्यात आली. समुद्रतटवर्ती भागामध्ये मासे पकडण्यासाठी मशिन क्रिया आधुनिक साधने उपलब्ध करून देण्यात आली. मच्छीमारांसाठी सहकारी संघाची स्थापना करण्यात आली. मासे पकडण्यासाठी लागणारी साधने त्यात इंजन, टुल, काठी, सुत स्वस्त किमतीत उपलब्ध करून देण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये मत्स्य विकासासाठी १२ करोड रू. व्यवस्था करण्यात आली. दुसऱ्या पंचवार्षिक योजने अंन्तर्गत समुद्रातुन होणारे मत्स्य उत्पादन ०.१ मिलियन टन होते व समुद्र वगळता ०.३ मिलियन टन उत्पादन होते. एकूण उत्पादन १.२ मि. टन होते.

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअन्तर्गत ४,००० नावावर यंत्र बसवुन मासेमारी करण्यात आली. मासे पकडण्यासाठी बंदरांचा विकास केला गेला. १९५८ पर्यंत जवळपास तिन लाख एकर क्षेत्राचे सर्वेक्षण केल्या गेले व १३००० एकर क्षेत्र विकसित केल्या गेले. मत्स्य विकासासाठी आन्तदेर्शीय मत्स्य उद्योग व प्रबन्ध यासाठी प्रशिक्षण सुरू करण्यात आले.

**मत्स्य उत्पादन व समुद्री उत्पादनाची निर्यात**

| वर्ष | मत्स्य उत्पादन लाख टन | | | समुद्री मत्स्य उत्पादनाची निर्यात | |
|---|---|---|---|---|---|
| | समुद्री | अन्तर्देशिय | एकूण | संख्या लाखात | मूल्य (करोड रू.) |
| १९५०—५१ | ५.३ | २.२ | ७.५ | ०.२ | २ |
| १९६०—६१ | ८.८ | २.८ | ११.६ | ०.२ | ४ |
| १९७०—७१ | १०.९ | ६.७ | १७.६ | ०.४ | ३५ |

स्त्रोत — Economic Survey – १९९७.९७ तक्ता क्र. ८.१७

वरिल तालिकेवरून स्पष्ट होते की १९५०—५१ मध्ये समुद्री मत्स्य उत्पादन ५.३ लाख टन होते तर अंन्तर्देशिय उत्पादन हे २.२ लाख टन होते. एकुण उत्पादन ७.५ लाख टन होते. १९५०—५१ मध्ये ०.२ लाख टन निर्यात करण्यात आली व त्यापासुन देशाला २ करोड रू. प्राप्त

झाले १९६०—६१ मध्ये समुद्री उत्पादन ८.८ लाख टन अंन्तर्देशीय उत्पादन २.८ लाख टन एकुण उत्पादन ११.६ लाख टन झाले. त्यातील ०.२ लाख टन निर्यात करण्यात आली व त्यातून ४ करोड रू. मुल्य प्राप्त झाले.

**मेंढीपालन व लोकर विकास—**देशातील पशुउत्पादनामध्ये मेंढी व लोकर व्यवसायाला महत्वाचे स्थान आहे. परंतु आजही देशात चांगल्या दर्जाच्या लोकराची आयात करावी लागते. देशात २ करोड ३० लाख लोकराची आयात केल्या गेली. लोकराची गजर पूर्ण करण्यासाठी लोकर उत्पादन वाढविणे व त्याची गुणवत्ता सुधारणे आवश्यक आहे.दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या शेवटपर्यंत ४ मेंढी प्रजनन फार्म व ३८० विस्तार केन्द्र स्थापन करण्यात आली. देशातील मेंढीची नस्ल सुधारण्यासाठी प्रयत्न केल्या गेले. लोकर कापण्यासाठी नविन साधने देण्यात आली. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत ६ मेंढी प्रजनन फार्म व ४००० विस्तार केन्द्र खोलण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. तिसऱ्या पंचवार्षीक योजनेअंन्तर्गत लोकराचे एकुण उत्पादन जवळपास ७ करोड २० लाख पौंड प्रत्येक वर्षाला होते.

**सहकारीता व पंचवार्षीक योजना:—**देशामध्ये सहकारी संघटनांची विशेष आवश्यकता कृषी संम्बधीत कर्ज, उत्पादनाची विक्री ग्रामीण क्षेत्रातील उत्पादन, कामगाराची सहकारी संस्था सहकार निर्माण समिती इ. सहकारी क्षेत्राचा मुळ उद्देश आर्थिक देवाणघेवाणीसाठी महत्वपूर्ण आधार बनविणे. दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये सहकारीता विकासासाठी अनेक कार्यक्रम आखण्यात आले. या सहकारीतेचा विकास ग्रामीण भागात कर्ज पूरवठा करण्यासाठी  करण्यात आला.

पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये मुख्यत: रिजर्व बँक ऑफ इंण्डीयानी सहकारी व्यवस्थेला पुनर्गठीत करण्यासाठी अनेक उपाय करण्यात आले. त्यावेळी सहकारी चळवळीमध्ये २२ राज्य सहकारी बँक तर ४९९ सेन्ट्रल बँक व बँक युनियन, १२६९५४ प्राथमिक कर्ज सोसायटी स्थापन करण्यात आल्या. त्याचबरोबर प्राथमिक स्तरावर कार्य करण्यासाठी ३०३०६ कर्ज संस्था या कृषी कार्यासाठी व ८३८९ संस्था या कृषी व इतर कार्यासाठी कर्ज देतात. प्राथमिक कृषी कर्ज देणाऱ्या संस्थाची संख्या ५८ लाख व गैर कर्ज संस्था या २७ लाख आहे.द्वितीय पंचवार्षीक योजनेदरम्यान सहकारीता विकास करण्यासाठी प्राथमिक कृषी कर्ज संस्थाची सदस्य संख्या ५० लाख वरून दिड करोड करणे व सहकारी चळवळीच्या माध्यमातुन जी धनराशी दिली जाईल ती अल्पकालीन कर्जाच्या स्वरूपात ३० ते १५० करोड पर्यंत तर दिर्घकालीनन कर्जाच्या रूपात ३ ते २५ करोड पर्यंत वाढविले द्वितीय पंचवार्षीक योजनेत रिजर्व बँकने दिलेल्या रक्कमेला वगळता योजनेमध्ये ४८ करोड रू. व्यवस्था करण्यात आली.तिसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये सहकारी विकास — संबंधी कार्यकारी दलाने ५० तांदूळ मिल ३०० धान यंत्र, २० तागाचे गाठे बांधण्याचे यंत्र, २० तेलाचे प्रतिष्ठान, ५० साल काढणारी यंत्रे, ७३० फळाची टिनबन्दी करणारे प्रतिष्ठान व ५ आटा चक्की स्थापन करण्यासाठी प्रस्ताव देण्यात आला. डेरी विकास कार्यासाठी ७५  दुध प्रक्रिया प्रतिष्ठान व गावामध्ये ३० मलाई काढणारे कारखाने काढण्याचे ठरवून हे सर्व सहकारी आधारावर संघटीत केल्या गेले.

**सामुदाईक विकास व कृषी:—**स्वातंत्र्य प्राप्तीनंतर राष्ट्रीय विस्तार आणि सामुदाईक विकास योजना अन्तर्गत कार्य करण्यासाठी जे क्षेत्र निवडण्यात आले त्यामध्ये कृषी, शिक्षण, स्वास्थ, ग्रामीण उद्योग व सहकारी क्षेत्र यांच्या आधारे विस्तार करण्यात आला. पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये ग्रामीण सेवांचा विस्तार व त्याद्वारा सामाजिक व आर्थिक जीवनामध्ये सुधारणा करणे इ. सामुदाईक विकासामध्ये मुख्यत: तीन गोष्टीवर भर देण्यात आला. त्यात सामुदाईक विकास हा जन सहयोगाच्या माध्यमातून विस्तारीत सेवाद्वारा सामुदाईक विकास असे कार्यक्रम आखणे त्यामधून सामुदाईक दृष्टीकोण विकसित होईल त्यासाठी सरकारी व गैरसरकारी कार्यकर्ता एक होवून काम करेल. जनतेचा सहभाग प्राप्त करण्यासाठी व विकासकार्य पूर्ण करण्यासाठी स्थानिक संस्था पंचायत, सहकारी समित्या, युनियन बोर्ड यांच्या साहयाने कार्य केल्या जात तर काही ठिकाणी अनिवार्सीत समित्या बनवून विकास कार्य त्यांच्याकडे सोपविण्यात आले. उदा. मध्यप्रदेशामध्ये ग्राम विकास मण्डल, उडीसामध्ये ग्राम मंगल समिती, मद्रासमध्ये ग्राम सेवा संघ तर बंगालमध्ये पल्ली उन्नयन समिती यांना ग्राम विकासाचे कामे सोपविण्यात आली.दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये राष्ट्रीय विस्तार सेवा सुरू करणे व चालु विकास खंडामधून कमीत कमी ४० टक्के खंड सामुदाईक विकास खंडामध्ये रूपांतरीत करण्यात आले. यासाठी जवळपास २६३ करोड रू. खर्च करण्यात येणार होते परंतु प्रत्यक्षात २ अरब रूपयांची मंजूरी देण्यात आली. पहिल्या पंचवार्षीक योजनेमध्ये कृषी, पशुपालन, सिंचन शिक्षण, स्वच्छता, संचार इ. कार्यक्रम आखण्यात आले. दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये रोजगाराच्या संधी वाढविणे ग्रामोद्योग, छोटे

उद्योग, सहकारीता विकास, आदिवासी भागात विकास इ. कार्यक्रम घेण्यात आले.दुसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये कर्मचाऱ्याच्या प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली तसेच ग्राम सेवकांच्या विस्तारासाठी व प्रशिक्षणासाठी दुसऱ्या पंचवार्षीक योजना काळामध्ये देशभरामध्ये कृषी महाविद्यालय व शिक्षण केंद्रामध्ये एकुण ७१ विस्तार प्रशिक्षण केन्द्र आणि ८५ कृषी शाळा सुरू करण्याचा विचार करण्यात आला याद्वारे लोकांच्या जीवनमानात बदल घडविण्याचा प्रयत्न करण्यात आला.तिसऱ्या पंचवार्षीक योजनेमध्ये सामुदायीक विकास व सहकारीतावर एकुण ४०० करोड रू. खर्चासाठी ठेवण्यात आले. या योजनेअंतर्गत ग्रामीण अर्थव्यवस्थेचा पुननिर्मितीसाठी शेतीशी संबंधीत तसेच उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाय योजून उत्पादन वाढविण्यावर भर दयावा. त्यासाठी कृषी विभागाने सामुदायीक विकास संगठनांना आवश्यक सामान प्रशिक्षीत कार्यकर्ता उपलब्ध करून दयावे. शेतीला प्राथमिकता देत असताना योजनांमध्ये शेतीसाठी जास्तीत जास्त बजेटची व्यवस्था व कृषीकार्यासाठी नियोजीत रक्कम त्याच कार्यासाठी वापरली जावी.

**सुधारीत बि—बियाणे—**कुठल्याही देशाच्या कृषीउत्पादनात वाढ करण्यासाठी सुधारीत बि—बियाणाची आवश्यकता असते. सुधारीत बि—बियाणाचा वापर केल्यास १० ते २० टक्के उत्पादन वाढ होवू शकते. भारतामध्ये सुधारीत बियाणे तयार करण्यासाठी कृषी विभाग, कृषी महाविद्यालये व भारतीय कृषी अनुसंधान परिषद यांनी सुधारीत बियाने बनविण्याचे कार्य केलेले आहे. भारतामध्ये गहु व तांदूळ यांचे सर्वात चांगल्या बियानांची निर्मिती केल्या जात आहे. द्वितीय पचंवार्षीक योजनेमध्ये चांगल्या प्रकारचे बिज निर्माण करण्यासाठी बिज—फार्म (ैममक तिउे) तयार करण्यात आले. १९६३ मध्ये 'राष्ट्रीय बिज निगम' (छंजपवदंस ैममके ब्वतचवतंजपवद) ची स्थापना केल्या गेली.

**भुमी चकबन्दी:—**देशातील जमीनीचे अनेक लहान खंडात विभाजन झालेले दिसून येते. त्यामुळे जमिनीचा आकार फार कमी—कमी होत असे काही खंड इतके लहान झाले होते की त्यावर कृषी संबंध कार्य करणे अशक्य होते. तसेच जमिनीचे तुकडे अनेक भागात विभागलेले असुन भारतीय जमिनीचे अनुवंशीक तत्वावर विभाजन होत असल्यामुळे प्रत्येक वडील आपल्या मुलांमध्ये त्याचे वाटप करतो. देशातील लोकसंख्या जशीजशी वाढते तसे जमिनीचे लहान भागात विभाजन होत आहे. देशात कृषीकरणाऱ्या लोकांमध्ये जमिनीप्रती जास्तीत जास्त जिव्हाळा असल्यामुळे कृषी खंडाचे विभाजन वाढलेले दिसुन येते. प्राचीन काळात संयुक्त कुटूंब पध्दती होती. त्यामुळे जमिनीचे विभाजन होत नव्हते परंतु आज विभक्त कुटूंब राहत असल्यामुळे जमिनीचे विभाजन मोठया प्रमाणात वाढलेले दिसुन येते.देशातील भुमीचे विघटनाला आळा घालण्यासाठी 'चकबन्दी' हा उपाय महत्वाचा आहे. ज्याद्वारे विविध स्थानावर असणारे खंडाणा समान भुमी एका ठिकाणी आणल्या जाते व भुक्षेत्राचा आकार वाढविल्या जातो. चकबन्दीमध्ये ज्या शेतकऱ्याची जमिन वेगवेगळया ठिकाणी विखुरलेली असते त्यांना त्याच समान जमिन दिली जाते. त्यामुळे कृषीचा विकास करणे शक्य होईल व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून उत्पादन वाढविता येईल.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर देशात जवळपास (तामिळनाडू व केरळ) वगळता सर्व राज्यात चकबन्दी लागु करण्यता आली. सुरूवातीला ऐच्छीक असणारी चकबंन्दीचे दोष दिसुन आल्या नंतर तिला अनिवार्य करण्यात आले. मुंबई अधिनियम, पंजाब अधिनियम, राजस्थामधील जोत चकबन्दी (१९५४), बिहारमध्ये १९५६, आसाम व कर्नाटकामध्ये १९६०, उत्तरप्रदेश व जम्मू—कश्मीर मध्ये १९६२ मध्ये चकबन्दी अधिनियम लागु करण्यात आले. चकबन्दी व्यवस्था पंजाबमध्ये मोठया प्रमाणता यशस्वी झालेली दिसुन येते. १९५६ मध्ये फक्त ४५ लाख हेक्टर जमिनीची चकबन्दी केल्या गेली. देशामध्ये चांगल्या प्रकारची चकबन्दी ही पंजाब, हरियाना व उत्तर प्रदेशामध्ये झालेली दिसुन येते.

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उत्पादनात झालेली वाढ:—** स्वातंत्र्य प्राप्तीनंतर कृषी उत्पादन वाढविण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्याव त्यामधून कृषीचे उत्पादन वाढलेले दिसून येते.

**स्वातंत्र्य प्राप्तीनंतर उत्पादनात झालेली वाढ**

| | | प्रति हेक्टर उत्पादन | | वार्षिक वृध्दि दर (:) |
|---|---|---|---|---|
| | | १९५०—५१ | १९६४—६५ | १९४९—५० ते १९६४—६५ |
| १) | सर्व खाद्यान्न | | | |
| | तांदुळ (क्विंटल) | ७.१ | १०.८ | २.१ |
| | गहु (क्विंटल) | ६.६ | ९.१ | १.३ |
| | मोठे अनाज (क्विंटल) | ४.३ | ५.१ | १.३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | दाळ (क्विंटल) | ४.० | ५.२ | ०.२ |
| २) | सर्व खाधान्य व्यतीरिक्त इतर पिके | | | |
| | तिळ (क्विंटल) | ५.२ | ५.६ | ०.१ |
| | ऊस (टन) | ३४ | ४७ | १.० |
| | रूई (किलोग्रॅम) | ९५ | १२२ | २.० |
| | आलु (क्विंटल) | ६६ | ८४ | १.६ |

स्त्रोत — Economic Survey (२०१४.१५) Agricultural Statistics a Glance, २०१४

१९५०—५१ मध्ये तांदळाचे उत्पादन ७.१ होते. ते १९६४—६५ मध्ये १०.८ झाले. गहु उत्पादन ९.१ किंटिटल झाले. मोठे अनाज उत्पादन १९६४—६५ मध्ये ५.१ किंटिटल झाले. दाळ उत्पादन ५.२ किंटिटल झाले. तिळ उत्पादन ५.६ किंटिटल झाले. ऊस उत्पादन ४७ टन, रूई उत्पादन १२२ कि. ग्रॅ., आलू उत्पादन ८४ किंटिटल झालेले दिसुन येते.

**सारांशः—**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर देशाचा कृषी विकास करण्यासाठी अनेक उपाययोजना करण्यात आल्या. पंचवार्षीक योजनाच्या माध्यमातुन नियोजन, आधुनिक तंत्रज्ञान, सुधारीत बियाने, रासायनिक खताचा वापर, किटकनाशके इ. वापरामुळे उत्पादन वाढायला सुरूवात झाली. देशामध्ये १९५६ ते ६६ या कालखंडात खाद्यान उत्पादन ६९.३४ मिलियन टन झाले. त्यामुळे देशाची अन्नधान्याची आयात कमी होवून १९५१—५२ मध्ये आयात ३.९२ मिलियन टन होती. ती १९५५—५६ मध्ये १.३७ मिलियन टनावर आली. दुसऱ्या पंचवार्षीक योजना काळात दुष्काळ पडल्यामुळे उत्पादनात कमी आली. इ.स. १९५७—५८ मध्ये एकूण उत्पादन ६६.६३ मिलियन टन झाले. १९५७—५८ मध्ये ३.३१ मिलियन टन आयात करावी लागगली. १९५८—५९ मध्ये अन्नधान्य उत्पादन ७८.८० मिलियन टन झाले. ते अगोदरच्या वर्षापेक्षा १२.२ मिलियन टन जास्त होते. १९६०—६१ मध्ये अन्नधान्य उत्पादन ८२.३३ मिलियनन टन झालेले दिसून येते.एकुणच पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी विकास होत असला तरी तो पाहिजे त्या प्रमाणात विकास होवु शकला नाही. देश आजही अन्नधान्य उत्पादनामध्ये स्वावलंबी होवू शकला नाही. तरी सुद्धा या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून भारतीय कृषी विकासाचा पाया घातला गेला असे म्हणतात येईल.

**संदर्भ :—**

१. कळशिकर, ह.मा., “आर्थिक विकास निवड देश”, मेहता पब्लकेशन हाउस, पुणे — पृष्ठ क्र. ११०
२. योजना आयोग, विविध योजना प्रलेख — आर्थिक समिक्षा (२०१२—१३)
३. प्रथम पंचवार्षिक योजना प्रारूप (१९५१) योजना आयोग भारत सरकार, पृष्ठ क्र. १०२, १११
४. अग्रवाल, ए.एन. (१९९१) “भारतीय अर्थव्यवस्था विकास एवं आयोजन” वाईली इस्टर्न लिमिटेड, पृष्ठ क्र. १०२, २९८, ३००, ३४०, ३४२
५. दत्त, ग व महाजन, अ (२०१६) “भारतीय अर्थव्यवस्था”, एस.चंद पब्लीकेशन पृष्ठ क्र. ५८७, ५६८
६. गुप्ता, पि.के. (२०१३) “कृषी अर्थशास्त्र” वृंदा पब्लिकेशन प्रा.लि. पृष्ठ क्र. ३७०, ३७४
७. दुसरी पंचवार्षिक योजना प्रारूप — योजना आयोग — भारत सरकार पृष्ठ क्र. ६६, ७९, ८३,८४
८. तिसरी पंचवार्षिक योजना प्रारूप — योजना आयोग — भारत सरकार पृष्ठ क्र. १६१, १५९, १६०,१५४, १५७
९. अग्रवाल, एन.एल. (२००७) “भारतीय कृषी का अर्थतन्त्र” ‘राजस्थान हिन्दी ग्रंथ अकादमी’ जयपूर — पृष्ठ क्र. १०१.